महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४४७(२)/२०२०/वीस दिनांक:- २९ एप्रिल, २०२२

# प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२०**
**सर्वसाधारण गुणवत्ता यादी, पसंतीक्रम व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत.**

राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२० या परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो, उमेदवार अपात्र ठरू शकतो.

३. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

४. प्रस्तुत परीक्षेकरीता अधिसूचित संवर्ग/पदासाठी भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) तसेच पसंतीक्रम (Preference Number) विकल्प सादर करण्याकरिता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITES या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक २ मे, २०२२ रोजी १५.०० वाजेपासून दिनांक ९ मे, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

५. पसंतीक्रम अथवा भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्प यांच्या आधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

(१) वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व १५ संवर्गाकरीता १ ते १५ मधील पसंतीक्रम अथवा 'No Preference' विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(२) अधिसूचित सर्व पदांकरीता १ ते १५ मधील पसंतीक्रम निवडणाऱ्या उमेदवारांचा त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व पदांवरील निवडीकरीता विचार होईल.

(३) अधिसूचित १५ पदांपैकी ज्या पदांवरील निवडीकरीता इच्छुक आहे; केवळ त्याच पदाकरीता पसंतीक्रम सादर करावेत. ज्या पदांवरील निवडीकरीता इच्छुक नाही; त्या पदांकरीता ' No Preference' हा विकल्प निवडावा.

(४) कोणत्याही पदावरील निवडीकरीता इच्छुक नसणाऱ्या उमेदवारांनी 'Opting Out of all Preferences' या स्वतंत्र बटनाद्वारे त्यांचा विकल्प सादर करावा; असा विकल्प देणाऱ्या उमेदवारांचा कोणत्याही पदावरील निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही.

(५) पदांचे पसंतीक्रम अथवा भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प सादर केल्यानंतर 'Download PDF' हा पर्याय निवडून उमेदवारास सादर केलेले पसंतीक्रम जतन करुन ठेवता येऊ शकतील.

(६) पसंतीक्रम सादर करणारे उमेदवार ज्या संवर्ग/पदांकरीता पसंतीक्रम सादर करतील केवळ त्याच संवर्ग/पदांवरील निवडीकरीता त्यांचा विचार करण्यात येईल.

(७) विहित कालावधीनंतर संवर्ग /पदांचे पसंतीक्रम सादर करण्याची अथवा बदलण्याची उमेदवाराची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(८) भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम शिफारशीकरीता विचार करण्यात येणार नाही.

६. संवर्ग/पदांचे पसंतीक्रम / बाहेर पडण्याचा विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उदभवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

**ठिकाण- मुंबई.**

**उपसचिव, परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**